न्यास नोंदणी क्र.F/25 औरंगाबाद
स्थापना दिनांक :- 20/11/1957

# जिल्हा परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना, संचलित

# निरीक्षणगृह/बालगृह (मुलांचे) छत्रपती संभाजीनगर.

# एक हात मायेचा






कुठे कोपऱ्यात एक आहे पोरके मूल,
जसे पाषाणात उगवले बिनझाडाचे फूल,,
त्याच्या खांदयावर ओझे अनामिक भविष्याचे,
त्याच्या डोळयात भरले दु:ख उरल्या जन्माचे,,
त्याच्या डोक्यावर हात, वाटे मायेचा ठेवावा,
एक अंगार-फुंकून सुर्य त्याच्या मनी चेतवावा,,

## संस्थेस आपण अशा प्रकारे मदत करु शकता

- मुलांसाठी धान्य, किराणा, शैक्षणिक साहित्य इ.
- आपल्या परिवारातील प्रिय जनांचे वाढदिवस / स्मृतिप्रित्यार्थ अन्नदान
- बालकांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी क्रिडा कौशल्यासठी मदत
- बालकांकरिता कपडे, स्वच्छता साहित्य, रेनकोट, अंथरुण - पांघरुन किंवा आवश्यक वस्तू.

## कायम भोजन निधी योजना

**आपण पुढीलप्रमाणे ठेव ठेवल्यास त्याच्या व्याजातून दरवर्षी सदर खर्च केला जातो.**

| | |
|---|---|
| एक वेळचे मिष्टान्न भोजन | रु. 35,000/- |
| एक वेळचे साधे जेवण | रू. 21,000/- |
| एक वेळचा नाष्टा | रु. 10,000/- |
| एक वेळचे दुध | रु. 7,000/- |

## दैनदिन भोजन योजना

मुलांचे एका वेळचे मिष्टान भोजन,साधे भोजन,नाष्टा व दुध यासाठीचा खर्च

| | |
|---|---|
| एक वेळचे मिष्टान्न भोजन | रु. 3,000/- |
| एक वेळचा नाष्टा | रु. 1,500/- |
| एक वेळचे दुध | रु .1,000/- |

## टिप

1) 50 बालकांना एक महिन्या करीता लागणारा अंदाजे किराणा खर्च रू.35,000/-
2) 50 बालकांना पुर्ण एक ड्रेस अंदाजे खर्च रु.20,000/-

## देणगी देण्यासाठी

Name of the bank : Bank of Maharastra
Account Name : District Probation And Aftercare Association
Account No :60008728285
IFSC Code :MAHB0001191
PAN No: AAATD1961F
80 G/12 No : AAATD1961FF20219 Date.31.12.2021

**Donation is exempt u/s 11- Clause (I) of first proviso to sub section (5) of section 80G of Income Tax**


**अधिक माहितीसाठी संपर्क:**
**9028925723, 9420285505**

observationhome_aurangabad@rediffmail.com

पत्ता :- प्लॉट नं.७, हॉटेल ताज रेसिडेन्सीच्या पाठीमागे,
डि-मार्ट मॉल जवळ, SPI शेजारी, एन-१२, हडको, छत्रपती संभाजीनगर.


## आमचे आधारस्तंभ



स्वातंत्र सैनिक
**स्व.हिरूभाऊ जगताप**
संस्थापक सचिव



सहकार महर्षी
**स्व.बाळासाहेब पवार**
संस्थापक चेअरमन



संस्थेच्या आश्रयदाता
**स्व.सुधाताई बापूसाहेब काळदाते**
संस्थापक सचिव

## // संस्थेची माहिती //

स्वातंत्र्य सेनानी कै.विजयेंद्रजी काबरा, सहकार महर्षी मा.खासदार कै.बाळासाहेब पवार, स्वातंत्र्य सेनानी संस्थापक सचिव कै.एस.के उर्फ हिरुभाऊ जगताप, स्वातंत्र्य सेनानी कै. पुंडलिकराव रांजणगावकर, कै.गुरूबक्षसिंगजी छाबडा या समाजसेवकांनी जिल्हा परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित निरीक्षणगृह/ बालगृह, छत्रपती संभाजीनगर या स्वयंसेवी संस्थेची सन 1957 रोजी स्थापना केलेली आहे. सदर संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 नुसार नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था म्हणून कार्यरत आहे. सदर संस्थेस बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 नुसार महिला व बाल विकास, विभाग, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणी प्रमाणपत्र मिळालेले आहे.

सदर संस्थेत बाल न्याय मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशान्वये 18 वर्षाखालील विधीसंघर्षग्रस्त बालके दाखल असतात. तसेच बाल कल्याण समिती,छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशान्वये 06 ते 18 वर्षे वयोगाटातील, अनाथ, निराधार, एकपालक, बंद्यांची मुले, विनापालक मिळून आलेले काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालके दाखल असतात.

संस्थेतील बालकांना संस्थेच्या वतीने मोफत निवास, कपडे भोजन, शिक्षण, शालेय साहित्य, आरोग्य विषयक सोई-सुविधा, समुपदेशन, संगीत प्रशिक्षण इत्यादी सोई-सुविधा मोफत पुरविले जातात.

सन 1957 पासुन काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे शिक्षण,संगोपन व पुनर्वसन करण्याचे सामाजिक कार्य संस्था अविरतपणे करीत आहे. आजपर्यंत अंदाजे विस हजार बालकांनी संस्थेचा लाभ घेतलेला आहे.

संस्थेच्या उत्कृष्ट कार्याबददल महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या तर्फे विभागीय स्तरावरील सन 1997-1998 या वर्षीचा **आहिल्याबाई होळकर पुरस्कार** प्राप्त झालेला आहे.

श्री.मानसिंह बाळासाहेब पवार
कार्यकारी अध्यक्ष

श्रीमती सुशिला एस.जगताप
मानद सचिव

सर्व कार्यकारणी सदस्य व अजीव सदस्य

# संस्थेचे उपक्रम



मा.श्री.डॉ.प्रशांत नारनवरे, आयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची संस्थेस भेट

संस्थेतील बालके योगा करतांना





महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष मा.श्री.ॲड.तातेड साहेब, बालकांसोबत संवाद साधतांना

गुरूपौर्णिमा निमित्त गायन सादरीकरण करतांना बालक





आरोग्य शिबीर



विविध सांस्कृतिक कार्यक्रम

चाचा नेहरू बाल महोत्सवात नृत्य सादर करतांना बालके






प्रोझोन मॉल येथे श्यामची आई चित्रपट पाहतांनी बालके

दिपावली सणा निमित्त बालकाने तयार केलेले आकाश कंदील





खेळात दंग बालके

संगीत प्रशिक्षण



## संस्थेचे यशस्वी विद्यार्थी

१. मा.श्री.मारोतीराव गणेशराव कांगणे - मा.सेवानिवृत्त न्यायाधीश
२.डॉ श्रीराम जाधव- देवगिरी महाविद्यालय,छ.संभाजीनगर येथुन इतिहासचे प्रा.म्हणून सेवानिवृत्त
३. कैलास बन्सीधर माने - उदयोजक
४. शेख रिजवान शेख उस्मान- सेवा निवृत्त पोलीस अधिकारी
५. गोकुळसिंग संपतसिंग मलके- नारेगावचे माजी नगरसेवक
६. विशाल राजेंद्र सोनवणे- सध्या जालना येथे पोलीस सेवत आहे.
७. संदीप हरी गढरी - सध्या जे.जे.हॉस्पीटल मुंबई येथे स्टाप नर्स म्हणुन सेवेत
८. रामकुमार कुबेर - उदयोजक

**असे अनेक विदयार्थी आहे जे की,संस्थेत शिक्षण घेऊन मोठमोठया पदावरुन सेवानिवृत्त झाले,काही विदयार्थी सध्या सेवेत कार्यरत आहे.**

## संस्थेच्या भविष्यकालीन योजना

1. मुलींचे निरीक्षणगृह/बालगृह सुरू करणे.
2. निरीक्षणगृह /बालगहातील बालकांसाठी, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, यांच्या कामकाजासाठी सर्व सोई-सुविधायुक्त नवीन इमारत बांधकाम करणे
3. वाचनालय,वृध्दाश्रम,वस्तीगृह सुरू करण्यासाठी सर्व सोई-सुविधायुक्त नवीन इमारत बांधकाम करणे.
4. संस्थेतील बालकांसाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरू करणे.
5. स्वतंत्र वाचनालय सुरू करणे.
6. वृध्दाश्रम सुरू करणे.
7. डे-केअर सेंटर सुरू करणे.



संस्थेच्या नविन ईमारतीचे संकल्प चित्र



